स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्य विद्याशाखेअंतर्गत मराठी विषयातील पीएच.डी. (विद्यावाचस्पती)
या पदवीकरिता सादर केल्या जाणाऱ्या शोध-प्रबंधाची रूपरेखा

संशोधन विषय

“मराठी दंतकथेचे स्वरूप आणि विशेष : एक चिकित्सक अभ्यास”

*** संशोधक ***

प्रा.राजेश जयराम तगडपल्लेवार

मराठी विभागप्रमुख

भाई किशनराव देशमुख महाविद्यालय,
चाकूर, जि.लातूर

*** मार्गदर्शक ***

प्रा.डॉ.सुनीता सांगोले

पदव्युत्तर मराठी विभाग आणि संशोधन केंद्र

दयानंद कला महाविद्यालय,
लातूर-४१३५१२

जुलै -२०१७

प्रस्तावना

'लोकसाहित्य' हा लवचिक शब्द असून तो लोक आणि साहित्य या दोन पदापासून तयार झालेला आहे. साधारणपणे लोकसाहित्याचे ठळक दोन भाग पडतात. एक लोकसाहित्य जे म्हणजे भौतिक स्वरूपात असते तर दुसरे लोकवाङ्मय. यात लोकसमूहाच्या अलिखित किंवा मौखिक स्वरूपाच्या भावनाविष्काराचा समावेश होतो.

लोकसाहित्य अतिशय व्यापक असून संपूर्ण मानवी जीवन लोकसाहित्याने व्याप्त झालेले आहे. लोकसाहित्यात लोकगीत, लोकनाट्य, लोककला आणि लोककथा अशा स्वतंत्र घटकांचा समावेश होतो. या सर्व घटकांचे अनेक उपप्रकारही पडतात. यातील लोककथेचे दालन अधिक संपन्न असून वर्तमान साहित्यावर लोककथांचा अधिक परिणाम असल्याचा दिसतो. मराठी लोकवाङ्मयातील लोककथेचे दालन विविधतेने नटलेले आहे. यात वैविध्यता दिसून येते. देशाच्या बहुतेक भागात लोककथा आढळतात. म्हणजेच 'लोककथा' या अभ्यासनीय आहेत.

अशा या लोककथांचे वर्गीकरण करताना 'दैवतकथा', 'परिकथा', 'रूपककथा' आणि 'दंतकथा' असे अनेक प्रकार पडतात. प्राचीन काळात मनोरंजनाची कोणतीच साधने उपलब्ध नव्हती तेव्हा लोककथा मनोरंजनाचे कार्य करीत असे. लोकरंजनाचा आणि प्रबोधनाचा खूपसा मसाला लोककथेत भरलेला असतो.

लोककथा या कुणाच्या मालकीच्या असत नाहीत. लोककथेतून लोकमानस व समाज प्रकट होतो. लोककथेचा संबंध जसा रंजनाशी असतो तसाच तो धार्मिक आचरणाशी जोडल्यामुळे त्या आज पवित्र मानल्या जातात. भारतीय लोककथांची परंपरा अतिशय प्राचीन असून 'संपूर्ण जगातील लोककथांचा जनक म्हणजे भारत देश होय.' लोककथा या अतिशय प्राचीन असून रामायण, महाभारत यासारख्या पुराण महाकाव्यात अनेक लोककथांचा अंतर्भाव झालेला आहे. तसेच बौद्ध आणि जैन लोकवाङ्मयातील जातककथा आणि चुर्णी यातून लोककथेची परंपरा पहावयास मिळते.

लोककथेच्या दालनात देवतकथा, दंतकथा, परिकथा असे अनेक कथा प्रकार पहावयास मिळतात. यातील दंतकथेचे दालन अतिशय संपन्न असे आहे. दंतकथा यांना 'भाकडकथा' असेही म्हटले जाते. किंवा खोटा इतिहास म्हणजे दंतकथा अशी व्याख्याही केली जाते. अशा या दंतकथेचा अभ्यास करताना नवीन संदर्भ लक्षात येतात. दंतकथेला ऐतिहासिक घटनेचा आधार असतो. मात्र मौखिक परंपरेने तिचे स्वरूप पूर्णपणे बदललेले असते.

वास्तविक दंतकथा ह्या सत्य असतात; परंतु शतकानुशतकांपासून तिच्याभोवती समजुतीची पुढे चढल्यामुळे त्यात अत्यंत अल्प सत्य शिल्लक राहिले आहे. दंतकथेत ऐतिहासिक अंश असल्यामुळे त्यातील सत्य शोधण्याचा मानस या संशोधनामागे आहे. बहुतांशी दंतकथेच्या मुळाशी वास्तवातील स्थळ, काळ, व्यक्ती किंवा वस्तूशी संबंध असतो. उदा : अमूक स्थळाचे नाव हेच का? हे मंदिर कुणी बांधले? या प्रकारच्या दंतकथा प्रचलित आहेत, अशा सर्व दंतकथांचा सविस्तर अभ्यास करणे हा संशोधनाचा मूळ हेतू आहे.

संशोधन विषयाचे महत्त्व

लोकसाहित्यातील लोकवाङ्मयाचे दालन अनेक बाबींनी संपन्न आहे. या दालनातील लोककथा या खऱ्या अर्थाने महत्त्वपूर्ण आहेत. अशा या लोककथेतील अनेक प्रकारांपैकी 'दंतकथा' हा प्रकार विशेष मानावा लागतो. दंतकथांना सत्याचा स्पर्श आणि ऐतिहासिक आधार असल्याने ऐतिहासिक सत्य शोधावयाचे असेल तर दंतकथाच उपयोगी पडतात. एखाद्या घटना, प्रसंग स्थळ यांचे महत्त्व किंवा वेगळेपण शोधावयाचे झाल्यास दंतकथा या मदत करतात. म्हणून दंतकथांचा सर्वांगीण अभ्यास हा महत्त्वाचा आहे.

जेव्हा ऐतिहासिक पुरावे सापडत नाहीत (शिलालेख, ताम्रपट, ग्रंथ) त्यावेळी संशोधकाला अभ्यास करण्यासाठी दंतकथाच उपयोगी पडतात. त्याद्वारेच इतिहासाचे आकलन होऊ शकते. लोककथांचा अभयस हा माझ्या चिंतनाचा विषय असून दंतकथांचा परिपूर्ण अभ्यास करणे हा उद्देश आहे.

दंतकथेचा हेतू परंपरेने कल्पना व संचित स्वरूपात चालत आलेली लोकस्मृती जागृत करण्याचा असतो. अशा अनेक दंतकथा गावागावात आढळतात. स्थानिक ग्रामदेवता किंवा निरनिराळ्या उगमांवर अशा कथांतून उजाळा मिळू शकतो. अशा कथा स्थळांशी, काळाशी, व्यक्तीशी किंवा वस्तूशी घनिष्ठ नाते सांगणाऱ्या असतात. म्हणून त्यांचा परिपूर्ण अभ्यास होणे आवश्यक आहे हे या विषयाचे महत्त्व होय.

संशोधन विषयाच्या अभ्यासाचा हेतू

भारतीय लोकजीवनात लोककथा (दंतकथा) यांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. दंतकथेत विविधता, वेगळेपण असते. दंतकथा या व्यक्ती, स्थळ, काळ आणि प्रसंगाशी निगडित असल्याने आज त्यांचा ऐतिहासिक अंगाने अभ्यास होऊ शकतो. एखादे स्थळ का निर्माण झाले? व्यक्तीचे महत्त्व काय? अशा प्रश्नांचे निरसन या अभ्यासाद्वारे होऊ शकते.

दंतकथा सर्वदूर विखुरलेल्या आहेत. त्यांना ऐतिहासिक पुरावा नसला तरी लोकमानसात त्या कायम जिवंत आहेत. विज्ञान युगातही अशा दंतकथांना महत्त्व प्राप्त झालेले आहे. गावाचे नाव, उत्पत्ती या विषयीचे आकलन याद्वारे होऊ शकते. स्थळाचे महात्म्य काय? हे समजून घेऊन त्याचा अभ्यास करणे हा मानस आहे. भारतीय समाजात दंतकथा या लोकप्रिय आहेत. आजही दंतकथांचे महत्त्व कमी झालेले नाही. म्हणून त्यांचा सविस्तर अभ्यास करून भारतीय मानसिकता समजून घेणे हा अभ्यासाचा हेतू आहे.

संशोधन विषयाचे वेगळेपण

लोकसाहित्य हा संशोधनाचा महत्त्वाचा भाग आहे. अशा लोकसाहित्यातील लोककथा या अत्यंत महत्त्वाच्या आहेत. लोककथेच्या दालनात अनेक कथांचे प्रकार पडतात; पण 'दंतकथा' या वैशिष्ट्यपूर्ण आणि सर्वार्थाने वेगळ्या अशा आहेत. अशा दंतकथांना ऐतिहासिक, पौराणिक संदर्भ आहेत. स्थळ, काळ, व्यक्ती, प्रसंग इत्यादींशी दंतकथा निगडित आहेत. त्यामुळे दंतकिांचा अभ्यास सर्वार्थाने वेगळा असा आहे. या संशोधनातून इतिहासाचे आकलन होते. घटना, प्रसंग, स्थळ, काळ, व्यक्तींचे महत्त्व लक्षात येते लोककथेच्या दालनात

दंतकथांची संख्या विपुल प्रमाणात आहे. आदिम संस्कृतीचे अवशेष या कथांत अधिक प्रमाणात सापडतात. अशा कथांना अद्‌भूततेचे वलय असले तरी त्या आदी संस्कृतीचे मूल्य जपत आलेल्या आहेत. सत्याधार हा दंतकथेचा महत्त्वाचा विशेष होय.

दंतकथेविषयी लोकमानसात कुतुहल आहे. कारण या कथांत विविधता आहे. व्यक्ती, कथावस्तु, घटना, प्रसंग, निसर्ग अशा अनेकासंबंधी व्यक्तीच्या मनातील कल्पना आणि त्याच्या निर्मितीसंबंधी कुतुहल हेच मुख्य आहे. कुतुहल शोधणे हे या संशोधनाचे वेगळेपण होय.

संशोधनाविषयी मर्यादा

मराठी लोककथांचे दालन विशाल आणि व्यापक आहे. अशा या दालनात ‘दंतकथा’ या विपूल प्रमाणात आहेत. केवल ‘दंतकथां’चाच अभ्यास करणे महत्त्वाचे आहे.

कोणतेही संशोधन हे कधीही पूर्ण नसते. संशोधनाला वेगवेगळे पदर असतात. वेगवेगळ्या दृष्टिकोनातूनच एकाच विषयावरील संशोधन होऊ शकते. दंतकथेचा सर्वांगीण अभ्यास पूर्ण जरी होऊ शकला नाही तरी या संशोधनामुळे पूर्व इतिहास प्रकट होऊ शकत नाही. हे संशोधन अंतिम नाही; पण याद्वारे इतिहासाच्या अभ्यासाला निश्चितच मदत होऊ शकते. महाराष्ट्रातील निवडक दंतकथांच्या आधारे प्रस्तुतचे संशोधन कार्य पूर्ण केले जाणार असल्याने ही या विषयाची मर्यादा आहे.

संशोधन विषयाची सामग्री

‘मराठी दंतकथेचे स्वरूप आणि विशेष : एक चिकित्सक अभ्यास’ या विषयाचे संशोधन करण्यासाठी लोककथांचा आधार घेतला जाणार आहे. तसेच मराठवाडा व संपूर्ण महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात गावागावांत विखुरलेल्या व लोकमानसात आज जिवंत असलेल्या ‘दंतकथा’ ही सामग्री होय. संपूर्ण समाज किंवा व्यक्ती यांनी सांगितलेल्या कथा ही संशोधनाची सामुग्री राहणार आहे. याशिवाय लोककथांचे संकलन झालेली ग्रंथ, पुराण कथा व लोक हीच सामग्री महत्त्वाची आहे. अशी सामुग्री एकत्र करून त्यांचे वर्गीकरण करणे व त्यांचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे.

संशोधन पद्धती

'मराठी दंतकथेचे स्वरूप आणि विशेष : एक चिकित्सक अभ्यास' या संशोधन कार्यासाठी लोककथांचे संकलन असलेले विविध ग्रंथ, लोकसाहित्याचे ग्रंथ यांचा आधार घेऊन ग्रांथिक पद्धतीचा वापर तसेच ऐतिहासिक, मानसशास्त्रीय, संशोधन पद्धती स्वीकारली जाणार आहे. मुलाखत व प्रत्यक्ष स्थळांना भेटी देऊन मौखिक दंतकथांचा आधार घेतला जाईल. लिखित साधनांचा वापरही केला जाईल.

शोधप्रबंधातील प्रकरणांची रूपरेषा

प्रकरण पहिले : भारतीय लोककथांची परंपरा

या प्रकरणात प्रस्तावना, भारतीय लोककथांची परंपरा, प्राचीन लोककथांचे संग्राहक- लोककथांचे वर्गीकरण, लोककथांचे प्रकार, विशेष वेगळेपण नोंदविले जाणार आहे.

प्रकरण दुसरे : दंतकथेचे स्वरूप

या प्रकरणात प्रस्तावना, दंतकथेविषयी लोकमनातील कुतुहल, दंतकथेचे स्वरूप, दंतकथेची निर्मिती, दंतकथेचे प्रकार, दंतकथेचे वर्गीकरण इत्यादींचा अभ्यास केला जाणार आहे.

प्रकरण तिसरे : दंतकथेतील व्यक्ती आणि स्थळ

प्रस्तुत प्रकरणात प्रस्तावना, संकलित केलेल्या दंतकथेतील व्यक्ती, ऐतिहासिक व्यक्ती, पौराणिक व्यक्ती, सामाजिक व्यक्ती, व्यक्ती महात्म्य, दंतकथेतील तीर्थक्षेत्रे, गाव, नगर, निसर्गातील संदर्भ व अन्य उल्लेख यांचा समावेश केला जाणार आहे.

प्रकरण चौथे : दंतकथेतील कथा विशेष आणि कल्पनाबंध

या प्रकरणात प्रस्तावना, कथाविशेषांचे स्वरूप, कथेतील स्थान, दंतकथांचे विशेष, कल्पनाबंध इत्यादींचा अभ्यास केला जाणार आहे.

प्रकरण पाचवे : दंतकथेचे भाषिक व वैचारिक वेगळेपण

या प्रकरणात प्रस्तावना, दंतकथेची भाषा, भाषेचे स्वरूप, रचना, अभिव्यक्ती, दंतकथेत आलेले विचार, दंतकथेचे वेगळेपण यांचा अंतर्भाव असेल.

प्रकरण सहावे : दंतकथेचे ऐतिहासिक व सामाजिक महत्त्व

प्रस्तावना, संकलित दंतकथेची कालातितता, ऐतिहासिक व सामाजिक महत्त्व काय, काळाच्या ओघात दंतकथा का टिकून आहेत याचा अभ्यास केला जाणार आहे.

प्रकरण सातवे : आधुनिक मराठी कथेतील दंतकथा आणि वैज्ञानिकता

या प्रकरणात दंतकथा आणि आजची मराठी कथा यांचा संबंध शोधला जाणार असून मराठी कथाकारांनी आपल्या कथांत दंतकथांना महत्त्व कशा पद्धतीने दिले याचा अभ्यास केला जाईल. मराठी कथाकारांच्या निवडक कथेतील दंतकथेचे कोणते कल्पनाबंध आलेले आहेत याची सिद्धता केली जाईल.

प्रकरण आठवे : समारोप आणि निष्कर्ष

या प्रकरणात शोध प्रबंधाचा सारांश देण्यात येणार असून प्रकरणाच्या शेवटी दंतकथा का 'अक्षर' आहेत हे मांडण्याचा प्रयत्न असेल. तसेच शेवटी संशोधनाअंती हाती आलेले निष्कर्ष क्रमश: दिले जातील.

परिशिष्ट्ये

१. घटनास्थळांची छायाचित्रे

२. कथासंकल्प करताना घेतलेल्या मुलाखती

३. निवडक संकलित दंतकथा

४. संदर्भग्रंथ सूची

टीप : उपरोक्त आराखड्यात संशोधन कार्यास गती प्राप्त झाल्यानंतर बदल होणे संभवनीय आहे.

मार्गदर्शक — संशोधक

प्रा.डॉ.सुनीता सांगोले — **प्रा.राजेश जयराम तगडपल्लेवार**